**रे.दि.मु.क्र. ३१०/१९९३ मधील निशाणी ३२४ वरील आदेश**

(CNR NO.MHST-070000381993)

रविंद्र राजामरा जाधव ––– वादी

वि.

राजाराम मारूती जाधव वगैरे ––– प्रतिवादी

सदरहू अर्ज प्रस्तावित वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरूस्ती करण्याकरीता दाखल केला आहे. सदर अर्जास पुरक शपथपत्र देण्यात आलेले आहे. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले.

२. वादीचे कथन असे की, प्रतिवादी क्र. ८ दत्तू मारूती जाधव हे दि. २५/१२/२०२४ रोजी मयत झाले असून त्यांचे नावास कंस करून त्यांचे वारसांना समाविष्ट करणे आवश्यक आहे. तसेच, प्रतिवादी क्र. ८ यांची पत्नी अनुसया दत्तू जाधव हया दि. २०/०९/२०२० रोजी मयत झाल्या आहेत. सदरील दुरूस्ती आवश्यक असून सदर दाव्यात कोणताही बदल होत नाही. तसेच, सदरील प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होत नाही. सबब, प्रस्तुत दुरूस्तीचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे. प्रतिवादींचे वकीलांनी कथन केले की, अर्जातील कारण योग्य नाही. करीता, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. वादीने प्रतिवादी क्र. ८ मयत झाल्याबाबत मृत्यू प्रमाणपत्र दाखल केले असून प्रतिवादी क्र. प्रतिवादी क्र. ८ दत्तू मारूती जाधव हे दि.२५/१२/२०२४ रोजी मयत झाल्याबाबत मृत्यू प्रमाणपत्रावरून दिसून येते. दावा पुढे चालविण्याकरीता मयताचे वारसांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. दाव्याचे सरनाम्यात प्रस्तावित वादी कोणत्याही नवीन अनुतोषाची मागणी करीत नाही. त्यामुळे सदर अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर दुरूस्तीने दाव्याच्या मूळ स्वरूपात कोणताच बदल होत नाही. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**– : आ दे श :–**

१ वादीचा अर्ज (नि.३२४) मंजूर करण्यात येत आहे.

२ वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित दुरूस्ती १४ दिवसांच्या आत करून घ्याव्यात व सोबत दुरूस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३ प्रतिवादी क्र. ८ यांचे वारसांना नोटीस काढण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
ASHA VISHAL
MOHITE
Date: 2025.01.29
17:09:45 +0530

कराड. (श्रीमती ए.व्ही.मोहिते )

दि. २९/०१/२०२५. ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

कराड.